Vol 5 Issue 10 April 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**


Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University



**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldgrt.lbp.world**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 10 | April - 2016

Golden Research Thoughts

GRT

# भविष्याचा वेध घेऊ शकणारा एक दृष्टी राजकारणी ................. यशवंतराव चव्हाण

ऐश्वर्या होळकर
एम.ए. मराठी
मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. पुणे.

**प्रस्तावना : —**

19 व्या शतकातील भारताच्या आणि महाराष्ट्राच्या चळवळीतील एक ऐतिहासिक कामगिरी यशवंतराव चव्हाण यांनी केलेली आहे. पुरोगामी विचारसरणीचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांचा महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीत मोलाचे योगदान आहे. यशवंतराव चव्हाणयांनी महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक विचार मांडून आणि दूरदृष्टिकोन ठेवून केलेले हे कार्य महाराष्ट्राला प्रगतशीलतेतून प्रगल्भ करते आहे.

12 मार्च 1913 रोजी सातारा जिल्हयातील देवराष्ट्र या गावी यशवंतराव चव्हाण यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण देवराष्ट्र येथे घेवून पुढील शैक्षणिक वाटचाल सुरळीत व्हावी यासाठी कराडला यशवंतराव राहत असत. नैसर्गिक सुंदरतेची पार्श्वभूमी असलेल्या या देवराष्ट्र आनोाकच त्यांना जन्मभर आकर्षण राहिले. त्यातून त्यांची गावाकडील माणसांची ओड दिसून येते.

1930—32 च्या कायदे भंगाच्या चळवळीत वयाच्या 18 व्या वर्षी कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये त्यांनी तिरंगा झेंडा फडकावला. त्यामुळे त्यांना 18 महिन्यांची सजा झाली. 1931 साली कराची येथे भरलेल्या अधिवेशनात त्यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले. 1932—33 ला करावासात असताना त्यांनी लोकमान्य टिळक, म. गांधी, पं. नेहरू एन.एम. रॉय, कार्ल मार्क्स यांच्यात पुस्तकांचे वाचन करून त्यावर चिंतन, मनन करून त्यांनी त्यांची वैचारिकतेला सतत चालना दिली. असे त्यांनी 'कृष्णाकाट' या आत्मचरित्रातून सांगितले.



सातवीत असताना त्यांच्या शिक्षकांनी सगळया विद्यार्थ्यांना भविष्यात कोण होणार असे विचारले तेव्हा कोणी डॉक्टर, शिक्षक, समाजसेवक, असे बरेचसे काही सांगितले. परंतु यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षकांना असे सांगितले. कि.मी. यशवंतराव होणार या एका वाक्यातूनच त्यांची असणारी दूरदृष्टी दिसून येते. इथेच त्यांनी आपल्या राजकीय जीवनाचा पाया रोवला होता. गुलामगिरीची त्यांना अतिशय चिड होती. विद्यार्थी दशेतच यशवंतरावांच्या नेतृत्वाची चुणूक दिसली. 1942 साली सौ.वेणूताई यांच्याशी लग्न झाले. याचवेळेस यशवंतराव 1942 च्या आंदोलनात सातारा जिल्हयाचे नेतृत्व करत होते. अगदी बालपणापासून त्यांच्या भविष्याचा वेध होणारी दृष्टी आणि वैचारिकता त्यांच्या प्रत्येक कृतीमधून दिसून येते.

1930 च्या कायदेभंगाच्या चळवळीत सहभागी असल्याने त्यांना 18 महिन्याची सजा झाली. त्याकाळात त्यांनी महात्मा फुले याची सत्यशोधक चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकराची दलित चळवळ शहरी—ग्रामीण राजकारण, गांधीजींचे आंदोलन अशा अनेक गोष्टींवर चर्चेमुळे आणि तेथे भेटलेली माणसे, वाचलेली पुस्तके, झालेल्या चर्चा यातून आलेली नवीनाग या त्यांच्या भविष्याचा राहकीय जीवनाला पोषक गोष्टी तुरूंगवासाच्या काळात त्यांना मिळाल्या. त्यांनी त्या अगदी सूक्ष्मपणे ग्रहण केला त्यावर चिंतन, मनन केले त्यातून स्वतःचे अशी मते बनवली आणि पुढील प्रवासाची दिशा निश्चित केले यातून त्यांची दूरदृष्टी आपल्या नजरेस पडते.

'लोकशाहीचा अर्थ केवळ एक शासनाचा प्रकार असा होत असेल तर अशा लोकशाहीसंबंधी मला बिलकूल आकर्षण वाटणार नाही' असे परखडपणे बोलणारे यशवंतराव एक धुरंधर राकारणी होते. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती ही आपल्यासाठी सर्वाधिक अभिमानाची गोष्ट

आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीचा निर्णय घेण्यासाठी केंद्राच मन वळविण्यात यशवंतरावांनी प्रमुख भूमिका होती. पंडित नेहरूचे मन वळविण्यात ते यशस्वी ठरले.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाल्यावर यशवंतरावांनी सरकार चळवळ ग्रामीण भागात रूजविण्याचा प्रयत्न केला. सहकारी बँका, सहकारी साखर कारखानदारीला त्यांनी प्रोत्साहन दिले. 1962 मध्ये यशवंतराव देशाचे संरक्षणमंत्री झाले. चीनशी झालेल्या युद्धात भारताचा पराभव झाला. अशा परिस्थितीत संरक्षणमंत्राची पदाची शपथ घेतल्यानंतर हिमालयाच्या मदतीला सहयाद्री आला अशीच प्रतिक्रिया उमटली. यातून यशवंतराव चव्हाण यांना आपल्यावरती मोठमोठी आव्हाने स्वीकारून वैचारिक मंथनातून ती सोडण्याची सचोटी दिसून येते. चीन व पाकिस्तानाने परस्परांशी सलगी केल्यावर यशवंतरावाची नियुक्ती परराष्ट्र खात्याच्या मंत्रिपदावर केली. त्यावेळी रशिया, अमेरिकन, जपान इ. देशांना भेटी देऊन पुढे येणाऱ्या संकटाविषयी जागरण केले. त्याचवेळी आर्थिक मंदीच्या काळात त्यांच्यावर अर्थमंत्री पदाची जबाबदारी टाकली. त्यावेळी यशवंतरावांनी तयार केलेली अंदाज पत्रके विकासाला गती देणारी ठरली. गृहमंत्रीपदाच्या काळात बंगालमधील नक्षलवादांचा बिमोड करण्यात त्यांना यश आले होते.दिल्लीच्या राजकारणाबरोबर त्यांनी महाराष्ट्रातील राजकारणावर आपल्या दुरदृष्टीने पकड निमाण केलेली दिसून आली.

यशवंतराव चव्हाण यांच्या भाषणातून एक विचाार सुत्र जाणवते. आपल्या समाजातील घडामोडीकडे अतिशय जागरूकतेने पाहताना दिसतात. आपल्या सभोवताली घडणाऱ्या घटना प्रसंगाचे संदर्भ लावताना त्यांच्यातील विचारवंत, कार्यकर्ता सदैव चिंतनशील दिसतात. यशवंतराव चव्हाण यांच्या भविष्याच्या वेध घेणारी कृती ही त्यांच्या वक्तृत्वामधून स्पष्टपणे जाणवते. त्यांच्या वक्तृत्वाचे विषयच त्यांच्या दुरदृष्टीचा असलेला राजकारणी अशी ओळख करून देतात. यशवंतराव चव्हाण बोलायला उभे राहिल्यानंतर श्रोतावर्ग त्यांचे अमृतसमाण भासणारे बोल ऐकण्यासाठी अधिर झालेला असे त्यांनी शेतकरी वर्ग, स्त्रीया, दलित बांधव, समाजकारण, राजकारण, देशातील युवा तरूण पिढी, देशाचे आंतरराष्ट्रीय धोरण, सांस्कृतिक क्षेत्र, आर्थिक क्षेत्र इ. विषयावर त्यांनी आपली वेगवेगळी मते वेगवेगळया प्रसंगाच्या निमित्ताने मांडलेली आहेत.

तत्कालीन राजकीय, सामाजिक, कौटुंबिक क्षेत्रातील 1946 ते 1977 या काळातील महत्त्वाच्या घटनांचा तपशील आत्मचिंतनासह सादर करताना मान यशवंतरावांनी 'विरंगुळा' हया ग्रंथात प्रामुख्याने संयुक्त महाराष्ट्र चळवळ सत्तेतील क्रूरस्पर्धा दिल्लीची तिरपी चाल, या विषयांवर मनोगत व लेखन व्यक्त केले असून यातून त्यांचा अंतरंग बऱ्यापैकी समजते. 1962 साली जेव्हा भारत–चीन युद्ध झाले तेव्हा कृष्ण मेनन यांच्यावर जोरदार टीका झाल्या. त्यावेळी यशवंतराव चव्हाणांनी मात्र कृष्ण मेनन वर टिप्पणी करण्याचे टाळले. स्मितहास्य करीत ते म्हणाले, 'कधीतरी मीही माजी मंत्री होणार आहे. एकमेकांचे उणे काढण्यासारखे हे आहे.' यातून यशवंतरावांची संयमीवृत्ती व दूरदृष्टिकोन दिसून येतो.

आज महाराष्ट्रात राजकीय क्षेत्रात माननीय शरदचंद्रजी पवार, सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण व पंतगराव कदम यांसारखे वरिष्ठ नेते यशवंतरावांच्या आदर्श डोळयांसमोर ठेवून राजकीय क्षेत्रात वावरताना दिसतात. यातून यशवंतरावांनी भविष्यात उपयोगी पडेल अशी विचाारसरणी उभीकरून दूरदृष्टीचा प्रलय करून दिला असे म्हणावे लागते.

यशवंतरावांनी राजकारण करताना सत्तेचे विकेंद्रीकरण केले त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकास व्हावा यासाठी सत्तेच्या विकेंद्रीकरणाला विशेष महत्व दिले. त्यामूळे राजकारण एक चित्र बदललं गेलं. राजसत्तेचे धनी जनता आहे. जनता जनार्दन हाच माझा परमेश्वर आहे आणि ही जनता उपाशी राहू नये. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य त्यांना मिळावं यासाठी प्रशासनातील कार्यपद्धतीनं अमूलाग्र बदल केला. मंत्रालयातून घेतले जाणारे निर्णय गावपातळीवर आणण्यासाठी यशवंतरावांनी कार्यकर्त्यांची फौज तयार केली. ग्रामपंचायत, तालुका, पंचायत, जिल्हा परिषदांच्या माध्यमातून खेडयातील तरूण सक्षमपणे आपल्याला भागाचा विकास करण्यासाठी सज्ज झाले. सामूहिक नेतृत्वातून गुणसंपन्न, कर्तबगार तरूण पिढी या राज्यांच्या कारभार करण्यासाठी पुढे सरसावली. देशाचा कर लागली. यशवंतरावांच्या या कुशल दूरदृष्टीमुळेच महाराष्ट्राला धडाडीचे, कर्तृत्वान नेते लाभले.

यशवंतराव चव्हाणांच्या वरील सामाजिक चिंतनातून दलित आजही अज्ञानात, दारिद्रयात जातीयतीच्या विषमतेखााली पिचला आहे. राजकीय स्वातंत्र्यापेक्षा यशवंतरावांच्या सामाजिक समता हवी होती. तटाच्या बाहेर उभा असलेल्या दलित आदिवासींनी समाज विकासाच्या प्रवासात करून घेणे महत्त्वाचे वाटत हेते. देश बलवान करावयाचा असेल तर या दलिताच्या सर्वांगिण विकास करून त्यांना सशक्त केले पाहिजे हा विचार या चिंतनातून प्रकट झाल्याचे जाणवते. यातून त्यांची दूरदृष्टी नजरेतून सुटत नाही.

यशवंतराव चव्हाण यांनी यांच्या बालपणापासून समाजात, राजकारणात, सांस्कृतिक क्षेत्रात आणि सर्वच क्षेत्रामधून दूरदृष्टिने विचार करून जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर यशस्वीपणे वाटचाल केली. राजकारणामध्ये त्यांनी अनेक समस्या, संकटाना सामोरे जाताना त्यांनी भविष्यातील महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठीच प्रयत्न केलेले दिसून येतात. यातून त्यांच्या दृष्टया आणि दूरदृष्टीचा असणारा अंदाज येतो. यातून सर्वांगीण महाराष्ट्राचा विकास साधण्यासाठी केलेला उपाय योजना यांचा दूरदृष्टीचा प्रत्यय येतो.

***संदर्भ : –***

1.यशवंतराव चव्हाण 'कृष्णाकाठ रोहन प्रकाशन, प्रथमावृत्ती : 7 फेब्रूवारी, 1984 प्रस्टीज प्रकाशन.
2.यशवंतराव चव्हाण यांचे साहित्य : स्वरूप व समीक्षा यशोदिप पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती 12 फेब्रूवारी 2016.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.www.oldgrt.lbp.world